पुण्य नगरी

Thu, 01 Feb-18; Punya Nagari - Mumbai; Size : 221 sq.cm.; Circulation:22112; Page : 20

Tech SAFAR

# रिलायन्स स्मार्टमनी डॉट कॉम

**रिटेल गुंतवणूकदारांसाठी नवीन वर्षाची भेटवस्तू म्हणून रिलायन्स सिक्युरिटीज लिमिटेड या रिलायन्स कॅपिटल लिमिटेडच्या ब्रोकिंग आणि वितरण शाखेने नवीन वेबसाईट रिलायन्स स्मार्टमनी डॉट कॉमचा शुभारंभ केला. यामुळे रिटेल गुंतवणूकदारांना निव्वळ ३ क्लिकमध्ये कोणतीही वित्तीय उत्पादने ऑनलाईन खरेदी करता येतील. हे वित्तीय सेवांसाठी अशा स्वरूपाचे पहिले पोर्टल असेल, ज्यावर रिटेल गुंतवणूकदारांच्या सर्व वित्तीय गरजांसाठी वन स्टॉप शॉप (एकाच छताखाली सर्व पर्याय)ची सोय राहील. रिलायन्स कॅपिटलचा उद्देश वित्तीय सेवांसाठी भारताची सर्वात मोठी डिजिटल मार्केटप्लेस निर्माण करण्याचा आहे. या वेबसाईटवर सुरुवातीला २२ हजारांहून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतील. पुढच्या वर्षी ही संख्या वाढून ५० हजारांच्या वर जाईल.**

या पोर्टलमुळे रिटेल गुंतवणूकदारांना म्युच्युअल फंड्स, स्टॉक, कर्ज आणि विमा, पीएमएस, कॉर्पोरेट एफडी आणि बाँड यासारख्या उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीतून निवड करणे शक्य होईल. रिलायन्स स्मार्टमनी डॉट कॉमचे मुख्य वेगळेपण म्हणजे या पोर्टलचे साधेपण. ते फार विचाराने तयार करण्यात आले आहे. हे डिझाईन रिटेल ग्राहक वित्तीय गुंतवणुकीच्या परिभाषेत गोंधळू नयेत किंवा योग्य उत्पादन निवडीत चुकू नयेत याप्रमाणे करण्यात आले आहे. वेबसाईटचे डिझाईन साधे ठेवले असून इतर वैशिष्ट्ये अन्य शॉपिंग पोर्टलप्रमाणे ठेवण्यात आली आहेत. त्यामध्ये फिल्टर, बास्केट आणि कॅटलॉग असे पर्यायही आहेत. ही सगळी वैशिष्ट्ये ग्राहकांचा ऑनलाइन वित्तीय उत्पादन अनुभव सोपा करणारी आहेत. बास्केट हे स्टॉक आणि म्युच्युअल फंड्सचा संग्रह आहे. ते गुंतवणूक रक्कम, जोखीम आणि असेट क्लास आधारवर तयार करण्यात आले आहे. त्याला रोबो अॅडव्हायजरी सहाय्य असून ३६ रोबो व्यक्तीनुरूप शिफारसी देण्याकरिता सज्ज आहेत. याचे साधे आणि सुधारित सर्च इंजिन की-वर्ड



आधारित सर्चसाठी सक्षम आहेत, त्यामुळे अपेक्षित स्क्रिप्ट्स वेगाने शोधणे शक्य होते. याशिवाय नवीन गुंतवणूकदारांसाठी गुंतवणूक करणे सोपे व्हावे तसेच सविस्तर माहितीसोबत स्टॉक आणि म्युच्युअल फंडच्या शिफारसी पुरवणे, हे पोर्टल शिकण्याचे साहित्य- जसे की, वर्ग, ब्लॉग्ज, एफएक्यू उपलब्ध करून देते. ते ग्राहकांच्या विविध वित्तीय उत्पादने आणि गुंतवणूक पर्याय जाणून घेण्याच्या इच्छेप्रमाणे उपलब्ध होतात. या पोर्टलचे आणखी एक अभिनव वैशिष्ट्य म्हणजे म्युच्युअल फंड्ससाठी थर्ड पार्टी रेटींग, जे वॅल्यू रिसर्च नावाच्या स्वतंत्र म्युच्युअल फंड रिसर्च हाऊसकडून मिळाले आहे. हे रिसर्च हाऊस म्युच्युअल फंड स्कीम्सकरिता निःपक्षपाती डेटा विश्लेषणही पुरवते. सर्व वैशिष्ट्यांनी समृद्ध असलेली ही वेबसाईट डिजिटल इंडियाचे भविष्यातील अत्याधुनिक उदाहरण असून लोकांना वित्तीय सेवा मिळाव्यात म्हणून तंत्रज्ञानाने परिपूर्ण आहे. जे सेवा पुरवठादारांच्या कक्षेबाहेर आहेत, त्यांना सामावून घेण्यासाठी आणि ऑनलाईन उत्पादन खरेदीवर अधिक विश्वास निर्माण व्हावा यासाठी प्रयत्नशील आहे.